




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०२ ● अंक : २०५ ● पुणे ● शुक्रवार, दि. २७ जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


## हिंदी विरोधात

# दोन्ही ठाकरे बंधू मैदानात



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्रविरोधात ठाकरे बंधू मैदानात उतरले आहेत. जुलैच्या पहिल्या आठवड्यात ठाकरे बंधूंच्या मोर्चांनी महाराष्ट्र दणाणून निघणार आहे. राज ठाकरे पुरस्कृत मोर्चा 5 जुलैला तर 7 तारखेला उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मराठी समन्वय समितीचा एल्गार असणार आहे. ठाकरे बंधूंचे दोन वेगवेगळे मोर्चे एकाच दिवशी काढण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडूनही यासाठी हालचाली सुरु आहेत. तसेच वेगळा मोर्चा काढण्यासाठी 5 जुलैच्या मोर्च्यात सहभागी व्हावं, यासाठी प्रयत्न केले जात होते. यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे.

महाराष्ट्रतील शाळात हिंदीसक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी एक्स पोस्ट संजय राऊत यांनी केली आहे. त्यामुळे हिंदीसक्तीविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याचं निश्चित झालं आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली होती. तसेच काल मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईमधील गिरगाव चौपाटी येथे भव्य मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. तर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे गटाने ७जुलै रोजी हिंदी सक्तीविरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली होती.

मात्र मराठीच्या मुद्द्यावर दोन वेगवेगळे मोर्चे कशासाठी असा प्रश्न या घोषणांनंतर उपस्थित झाला होता. त्या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी आज सकाळी हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात एकत्रच मोर्चा काढण्यात येईल अशी घोषणा ट्विटच्या माध्यमातून केली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित छायाचित्रासह केलेल्या या ट्विटमध्ये संजय राऊत यांनी महाराष्ट्रतील शाळांत हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल ! जय महाराष्ट्र!असे म्हटले आहे. गेल्या काही काळापासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या. तसेच दोन्ही भावांनीही एकत्र येण्याबाबत सकारात्मक संकेत दिले होते. आता मराठी भाषेच्या मुद्द्यावर आणि हिंदी सक्तीविरोधात निघणाऱ्या मोर्चामधून ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याने या माध्यमातून राज्याच्या राजकारणालाही मोठी कलाटणी मिळणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मला तर वाटतं, मराठी माणसाची एकत्र ताकद दिसणं गरजेचं आहे. राज ठाकरे यांनी काल आवाहन केलं होतं, त्याला समोरुन प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेची गळचेपी आणि हिंदी भाषेची सक्ती आणि लादण्याचा प्रयत्न होतोय, त्याविरोधात मराठी माणसाने एकत्र येऊन आवाज उठवणे गरजेचे आहे. मराठी भाषा हा राजकीय मुद्दा नाही. मराठी भाषेपुढे कोणीही छोटं-मोठं नाही, सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. यासाठी राज ठाकरे सकारात्मक आहेत, आम्ही सगळे सकारात्मक आहोत. 5 जुलै रोजी हा मोर्चा एकत्रितपणे निघेल, अशी माहिती मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दिली आहे.

### राज ठाकरे यांनी दादाचा भुसा केला : दै. सामनातून टिका



**हिंदी सक्तीविरोधात 5 जुलैला आझाद मैदानावर जाणारा मोर्चा मराठी माणसाचा असेल. मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा भुसा केला. हिंदी सक्तीचा निर्णय कसा योग्य आहे, हे पटवून सांगण्यासाठी घरी आलेल्या भुसे यांची राज यांनी हजेरी घेतली. भुसे यांच्या प्रेझेंटेशनने राज यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे ते फेटाळून लावत राज यांनी हिंदी सक्तीविरोधात मोर्चाची घोषणा केली. गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा मोर्चा निघेल. या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. हा मोर्चा मराठी माणसाचा असेल. मराठी हाच मोर्चाचा अजेंडा असेल. या मोर्चाचे नेतृत्व मराठी माणूस करेल, असे राज यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत मोर्चाची 6 जुलै ही तारीख त्यांनी सांगितली. मात्र नंतर एक्स पोस्टच्या माध्यमातून 6 ऐवजी 5 जुलै रोजी सकाळी 10 वाजता हा मोर्चा निघेल, असे त्यांनी जाहीर केले. आजवर महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीनुसार आपल्याला पाचवीनंतर हिंदी भाषेचा पर्याय होता. त्याच शिक्षण पद्धतीत शिकून आपण मोठे झालो आहोत. असे असताना अचानक ही तिसरी भाषा का लादताय? पाचवीनंतर हिंदी भाषेचा पर्याय घेऊन तेच शिक्षण घेऊन दादा भुसे आज शिक्षण मंत्री झाले ना? त्यांना कोणी पहिलीपासून हिंदी शिकवलेली का, असा खरमरीत सवाल राज ठाकरे यांनी केला.**

## दैनिक आरंभ पर्वचा दणका

### 'दै. आरंभ पर्व'च्या 'नऱ्हे ऑन द स्पॉट' मोहिमेचा सकारात्मक परिणाम; गंधर्व चौकातील नाल्यावर अखेर कठडे बांधले



नऱ्हे on the spot आरंभपर्व



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील विविध नागरी समस्या सातत्याने मांडणाऱ्या 'दै. आरंभ पर्व'या स्थानिक दैनिकाने सुरू केलेल्या 'नऱ्हे ऑन द स्पॉट'या विशेष मोहिमेमुळे प्रशासनाला जाग येत असल्याचे ठळक उदाहरण गंधर्व चौकात पाहायला मिळाले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या गंधर्व चौकातील उघड्या नाल्यावर अखेर संरक्षक कठडे बांधण्यात आले, ही बाब नऱ्हेकरांसाठी दिलासा देणारी आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून या नाल्याची अवस्था अत्यंत धोकादायक होती. पावसाळ्याच्या दिवसांत पाणी भरल्यामुळे हा नाला ओळखू येत नव्हता, त्यामुळे अपघातांची शक्यता कायम होती. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक व वाहनधारक यांच्यासाठी ही ठिकाणे जीवघेणी ठरत होती. मात्र, या समस्येकडे संबंधित विभागांचे दुर्लक्ष होत होते.'नऱ्हे ऑन द स्पॉट'या सदरात दैनिक आरंभ पर्वने ही समस्या छायाचित्रांसह आणि ठळक शब्दांत प्रसिद्ध केली होती. त्या वृत्ताची दखल घेत स्थानिक नागरिकांतूनही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आणि प्रशासनाला त्वरीत उपाययोजना करावी लागली. परिणामी, गंधर्व चौकातील नाल्यावर लोखंडी कठडे बसविण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आणि काही दिवसांतच पूर्णही करण्यात आले.

#### स्थानिक नागरिकांकडून समाधान

**या कामामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. "दिवसेंदिवस वाढणाऱ्या समस्या फक्त निवडणुकीपुरत्या लक्षात घेतल्या जातात, मात्र 'आरंभ पर्व'ने सातत्याने आवाज उठवल्याने हे शक्य झाले," अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून मिळाल्या आहेत.**

#### पत्रकारितेचा खरा हेतू साकार

**'नऱ्हे ऑन द स्पॉट'या उपक्रमाचा उद्देश म्हणजे प्रशासनापर्यंत सामान्य जनतेच्या प्रश्नांची माहिती प्रभावीपणे पोचवणे आणि प्रत्यक्ष उपाययोजना घडवून आणणे हा आहे. गंधर्व चौक प्रकरणात हा उद्देश सफल झाल्यामुळे ही पत्रकारितेची लढाई जिंकली गेल्याचे चित्र आहे.**

#### पुढील टप्प्यात इतर समस्यांकडे लक्ष

**नऱ्हे परिसरात अजूनही अनेक नागरी अडचणी प्रलंबित आहेत – अपूर्ण रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, अतिक्रमण इत्यादी. 'दै. आरंभ पर्व'च्या 'नऱ्हे ऑन द स्पॉट' मोहिमेमार्फत याही समस्यांकडे लक्ष वेधले जाणार असून, नागरिकांनीही यासाठी माहिती पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

**गंधर्व चौकातील नाल्यावर कठडे बसवले जाणे हे फक्त एक काम नसून लोकशाही आणि सक्रिय पत्रकारितेच्या ताकदीचे प्रतीक आहे. 'दै. आरंभ पर्व' आणि 'नऱ्हे ऑन द स्पॉट' या उपक्रमाने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की, लोकांचे प्रश्न सतत आणि ठामपणे मांडले तर प्रशासनालाही उपाययोजना करावीच लागते.**

## ठळक बातम्या

### आलोक तोडकरला ब्रॉन्झ पदक

**धनकवडी (आरंभ पर्व): उझबेकिस्तान येथे झालेल्या १९ वर्षाखालील सेंट्रल एशियन व्हॉलिबॉल चॅम्पियन स्पर्धेत धनकवडीतील अलोक तोडकर याने आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रॉन्झपदक पटकावून देशाची मान उंचावली आहे. भारतीय व्हॉलिबॉल संघाने ब्रॉन्झपदक पटकाविले. संघात आलोक हा महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू होता. कझागिस्तानला तीन-एक असे पराभूत करून भारतीय संघाने ब्रॉन्झ पदकावर यशाची मोहोर उमटवली. या विजयात आलोकचा महत्त्वाचा वाटा होता. आलोकने या पूर्वीही अनेक स्पर्धांमध्ये चांगल्या कामगिरीचा ठसा उमटवला असून, व्हॉलिबॉल स्पर्धेत एक उदयोन्मुख खेळाडू म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. स्पर्धेसाठी आलोकला अप्पा रेणुसे परिवार, संतोष पवार आणि रोहित मालगावकर, अमोल बुचडे स्पोर्ट्स फाउंडेशन यांनी मार्गदर्शन केले होते.**

### गॅस वाहिनी फुटली

**खराडी (आरंभ पर्व) : खराडीत जुना मुंढवा रस्त्यावरील राघवेंद्र ड्रायक्लीनर्ससमोर महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) भूमिगत गॅस वाहिनी भूमिगत मलनिस्सारण वाहिनीच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात येत असलेल्या जेसीबीचा फटका बसून फुटली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. याठिकाणी भूमिगत मलनिस्सारण वाहिनीचे चेंबर भरले होते.**

# तळेगाव ते शिक्रापूर महामार्गाचे सर्वेक्षण सुरू

### वाहनांची संख्या, प्रकार आणि चालकांची माहिती गोळा करणार



**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

तळेगाव ते शिक्रापूर महामार्गाचे सर्वेक्षण दोन खासगी कंपन्यांनी सुरू केले आहे. पुढील सात दिवस हे सर्वेक्षण सुरू राहणार असून, वाहनचालकांकडून विविध माहिती गोळा केली जाणार आहे. या सर्वेक्षणाचा अहवाल भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) दिला जाणार आहे. राज्यातील सर्वात व्यस्त महामार्गांपैकी एक महामार्ग म्हणून शिक्रापूर-तळेगाव मार्गाचा समावेश होतो. या महामार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून लालफितीत अडकला आहे. परिणामी या महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गडद होत असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. महाराष्ट्र शासनाने या महामार्गाच्या विस्तारीकरणाची घोषणा केली आहे. यासाठी चार हजार २०६ कोटी रुपये मंजूर झाल्याची घोषणाही केली आहे. महामार्गाची निविदा प्रक्रिया मात्र अजून काढलेली नाही. तत्पूर्वी महामार्गाचा आराखडा तयार करावा लागणार असून, यासाठी विविध कंपन्यांनी त्यांचे सर्वेक्षण सुरु केले आहे. हा आराखडा 'एनएचआय'ला सादर केला जाणार आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. मात्र महामार्गाच्या विस्तारीकरणासाठी गेले अनेक वर्ष केवळ घोषणाच होत आहेत. तसेच गेल्या काही वर्षात अनेक सर्वेक्षण झाले आहेत. पण, महामार्गाच्या कामाला मात्र प्रत्यक्षात अजूनही सुरवात होत नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

महामार्गावरील वाहनांचे सर्वेक्षण करून नवीन महामार्ग किती रुंदीचा असावा, महामार्ग कसा असावा, रस्ता बनवल्यावर तो जास्तीत जास्त काळ कसा टिकेल, याचा पूर्ण अहवाल 'एनएचएआय'ला दिला जाणार आहे. खासगी कंपनीने महाळुंगे पोलिस चौकी आणि चाकण चौकात कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेराद्वारे वाहनांची मोजणी केली जाणार आहे. तसेच कंपनीचे प्रतिनिधी या महामार्गावर पुढील सात दिवस विविध ठिकाणी थांबून वाहनांना थांबवून चालकांकडून वाहन कुठून आले, कुठे चालले, आठवड्यातून, महिन्यातून किती वेळा या महामार्गावरून प्रवास करता, महामार्गावरून प्रवास करण्यासाठी किती वेळ लागतो यासह विविध माहिती गोळा केली जाणार आहे.

### संजय जगताप यांची बनावट स्वाक्षऱ्या करून तब्बल ३० कोटींची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काँग्रेसचे नेते आणि पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांच्या कुटुंबीयांची व त्यांच्या कंपनीतील संचालकांची बनावट स्वाक्षरी करून तब्बल 30 कोटी रुपयांचे बनावट कर्ज प्रकरण करून फसवणूक केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी एका खासगी वित्तीय संस्थेतील अधिकाऱ्यांसह चार जणांविरोधात बंडगार्डन पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजवर्धिनी संजय जगताप (वय 43, रा. सासवड) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे.




मिळालेल्या माहितीप्रमाणे, 2011 साली व्यावसायिक कामासाठी एका खासगी वित्तीय संस्थेकडून त्यांनी ३० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. 2018 पर्यंत त्यांनी संपूर्ण कर्जाची परतफेडही केली. त्यानंतर संबंधित वित्तीय संस्था दुसऱ्या कंपनीत विलीन झाली. विशेष म्हणजे, या संस्थेतील काही कर्मचारी विलीन झालेल्या कंपनीत रुजू झाले.

**संपत्ती जप्त करण्याची नोटीस : दरम्यान, 2023 मध्ये जगताप यांच्या कंपनीच्या संचालकांना कर्ज न फेडल्याची नोटीस पाठविण्यात आली. यामध्ये तारण ठेवलेली संपत्ती जप्त करण्याचा इशारा देण्यात आला होता. याबाबत चौकशी केली असता धक्कादायक प्रकार समोर आला.**

# हिंजवडीचा समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत करावा : नाना काटे

## वाहतूक कोंडी, अपुऱ्या नागरी सुविधा आणि दुरावस्थेवर कायमचा उपाय आवश्यक!



**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

हिंजवडीसारख्या अत्यंत वेगाने विकसित होणाऱ्या माहिती तंत्रज्ञान केंद्राच्या सर्वांगीण विकासासाठी आता ठोस पावले उचलण्याची गरज आहे, असे मत पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी "हिंजवडीचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत झाला पाहिजे!"अशी शासनाकडे मागणी केली आहे.

हिंजवडीमधील सध्याची स्थिती चिंताजनक : हिंजवडी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, माहिती तंत्रज्ञान उद्यानात होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, अपुऱ्या नागरी सुविधा आणि अनियोजित वाढ यामुळे आयटी कर्मचारी, स्थानिक रहिवासी तसेच उद्योजक वर्ग हैराण झाले आहेत. या सगळ्याचा थेट परिणाम परिसरातील जीवनमानावर होत आहे.

#UNCLOGHinjawadiITPark आंदोलनाला नागरिकांचा प्रतिसाद : या पार्श्वभूमीवर वाकड-पिंपरी चिंचवड रहिवासी विकास व कल्याण संघाचे अध्यक्ष श्री. सचिन लोंढे यांनी #UNCLOGHinjawadiITPark या नावाने जनआंदोलन सुरू केले असून, हिंजवडीचा पीसीएमसीमध्ये समावेश व्हावा, यासाठी ऑनलाईन स्वाक्षरी अभियान चालवले जात आहे. या अभियानास अल्पावधीतच हजारोंचा प्रतिसाद मिळत आहे.

नाना काटे यांनी या मागणीला ठाम पाठिंबा दिला असून नागरिकांनाही पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. "आपल्या एका स्वाक्षरीमुळे हिंजवडीच्या उज्ज्वल भविष्यास चालना मिळू शकते. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असे काटे यांनी म्हणाले.

हिंजवडीच्या नागरी हक्कांसाठी ही लढाई फक्त आयटी कर्मचाऱ्यांची नाही, तर संपूर्ण परिसराच्या भल्याची आहे. अधिक सुविधा, शाश्वत विकास आणि जीवनमानात सुधारणा हाच यामागचा मुख्य हेतू आहे.

### पीसीएमसीमध्ये समावेश झाल्यास काय फायदे होतील?

**रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व देखभाल, वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता यासारख्या नागरी सुविधा अधिक सक्षम, आयटी कर्मचारी व स्थानिक रहिवाशांना दिलासा, एकूणच या भागाचा नियोजनबद्ध व शाश्वत विकास**



# जिल्हा परिषद शाळांना संजीवनी कोण देणार?

राज्यात मराठी भाषेला तिसरा पर्याय म्हणून पहिलीपासून हिंदीची सक्ती यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नव्याने कात टाकल्याप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनीदेखील काही प्रमाणात 'बॅकफूट'ला जात सर्वसमावेशक चर्चा करून यावर निर्णय घेण्याचे जाहीर केले. मुळातच मराठी भाषेचा पुळका घेऊन राणा भीमदेवी थाटात उतरलेल्या राजकीय नेतेमंडळींचे मराठी भाषा, मराठी शाळांवरील प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम असल्याचे मागील काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. स्वत:ची मुले इंग्रजी माध्यम, सीबीएसई बोर्ड, दिल्ली बोर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, कॉन्व्हेंट शाळा अशा विविध इंग्रजाळलेल्या शाळांमध्ये घालायची आणि राजकीय व्यासपीठावरून मराठीच्या नावाने टाहो फोडत मराठी भाषिकांची मते मिळवायचा 'फंडा' गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे. मुंबई शहर, उपनगरात तसेच कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर, पनवेल-उरण, बदलापूर, कर्जत-कसाऱ्यापर्यंत मराठी भाषेच्या शाळा गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद पडल्या असून त्या त्या शाळेतील शिक्षकांना 'सरप्लस' व्हावे लागल्याने त्यांना अन्य शाळांची शोधाशोध करण्याची वेळ आली आहे. नोकरी टिकविण्यासाठी सभोवतालच्या परिसरात जाऊन तेथील मुले आपल्या शाळांमध्ये आणण्यासाठी विविध प्रकारचे द्राविडी प्राणायम करावे लागत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात शिरकाव होऊ लागल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाधिक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटल्याने तेथील शाळांनाही टाळे लावण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत असून यंदाही ही घसरण कायम राहिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्या त्या ग्रामीण भागातील पालकांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश न देता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य दिल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर हे संकट गडद होत असताना शिक्षण विभाग आणि तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी उदासीन असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांची कमी होणारी पटसंख्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण मोफत असूनही पालक खासगी शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करून शिक्षणाची निवड करत आहेत, यावरून पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत असल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळत आहे. शासन समग्र शिक्षण अभियान, शाळा दत्तक योजना, डिजिटल क्लासरूम अशा योजना जाहीर करते व राबविते. मात्र त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का, हाही प्रश्न आहे. पटसंख्या कमी होण्याचे प्रमाण येत्या काळात असेच कायम राहिले तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्येची होणारी ही घसरण आताच थांबविली नाही तर, भविष्यात ग्रामीण भागातील शिक्षणाची आणखी अधोगती होणार, हे निश्चित आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समग्र शिक्षा अभियान, शाळा समृद्धी योजना, डिजिटल क्लासरूम यांसारख्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कुठे कमी पडते, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार यावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्येत होणारी घट, ही गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या, सेमी इंग्रजी माध्यमांच्या अथवा सीबीएसई बोर्डाचे अभ्यासक्रम वेळीच सुरू केले असते तर ग्रामीण भागात महागडे शिक्षण देणाऱ्या इंग्रजी शाळांच्या संस्थांना शिरकाव करणेही अवघड झाले असते. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी त्या त्या काळांतील राज्य सरकारच्या शिक्षण मंत्र्यांनी, शिक्षण विभागाने आजतागायत कधीही गांभीर्याने प्रयत्न केलेच नाहीत. शाळांमध्ये पटसंख्या कायम राहावी किंवा वाढावी यासाठी शिक्षण विभाग व शिक्षकांकडून अपुरे प्रयत्न झाल्याने गावागावातील मुलांचा खासगी शाळांकडे वाढता कल गेल्या काही वर्षांमध्ये राहिला आहे. परिणामी तेथील इंग्रजी माध्यम व सुविधा यामुळे अनेक पालक मुलांना खासगी शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये पाठवू लागले आहेत. काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अनुपलब्धता, साधनसामग्रीची कमतरता हेही कारण आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांना टाळे लागत आल्याने टाहो फोडण्यात आता काहीही अर्थ राहिलेला नाही. स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी अथवा जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आता वरवरची मलमपट्टी नाही तर ठोस उपाययोजनांची गरज आहे. शहरी भागातील मराठी भाषा टिकविण्यासाठी आपल्याला आलेल्या अपयशाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविणे आवश्यक आहे. अनेक गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांना टाळे लागले आहे. हे चित्र सर्व राज्यामध्ये दिसण्यापूर्वीच राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने तसेच सत्ताधाऱ्यांनी, विरोधकांनीही एकत्रित येत प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंदी भाषेला पर्यायी भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करताच राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले; परंतु राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना लागत असलेले टाळे व त्या शाळांमधील शिक्षकांवर 'सरप्लस'च्या नावाखाली येऊ घातलेली बेरोजगारीची वेळ याकडे पाहण्यास कोणालाही वेळ नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांचे अस्तित्व न टिकल्यास गोरगरिबांच्या, शेतमजुरांच्या मुलांना आर्थिक गणितांची जुळवाजुळव न झाल्यास शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येणार आहे. सर्वांनाच इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील महागडे शिक्षण परवडणारे नाही. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांनी एकत्रित येणे व गावागावातील ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे; परंतु दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये.

या उक्तीप्रमाणे शहरी भागासाठी आपण काही करू शकलो नाही, निदान ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी संघटित होणे काळाची गरज आहे.

# तृप्ती देसाई यांच्याकडून महिला वारकऱ्यांना साडी वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक न्यायासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या आणि महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी यंदाही आषाढी वारीनिमित्त आपली परंपरा जपत महिला वारकऱ्यांसाठी विशेष उपक्रम राबवला. त्यांनी पुण्यातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या वारीतील महिला भगिनींना साडी वाटप करून त्यांचा सन्मान केला.



दरवर्षीप्रमाणे यंदाही तृप्ती देसाई यांनी वारीत सहभागी झालेल्या अनेक महिला वारकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्याशी आत्मीयतेने वागणूक दिली. यावेळी महिलांना नुसतेच साडी वाटप न करता त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांना मानसिक पाठबळही दिले. वारकरी संप्रदायातील महिलांना केवळ श्रद्धेने नव्हे तर सन्मानाने जगता यावे, यासाठी देसाई यांचे हे पाऊल महत्त्वाचे ठरले आहे.

या उपक्रमात सहभागी झालेल्या महिलांनीही आनंद व्यक्त करत देसाई यांचे मन:पूर्वक आभार मानले. "प्रत्येक वर्षी आषाढी वारीच्या निमित्ताने तृप्ती ताई आमच्यासाठी काही ना काही करते. यंदा साडी मिळाली, खूप बरे वाटले," अशी भावना एका महिला वारकरीने व्यक्त केली.



**"वारी ही केवळ श्रद्धेचा नव्हे तर समतेचा मार्ग आहे. महिलांनाही यामध्ये आत्मसन्मानाने सहभागी होता यावे, हा माझा प्रयत्न आहे. साडी वाटप हे केवळ एक निमित्त आहे, पण त्या मागील भावना म्हणजे त्या भगिनींना मान, आपुलकी आणि प्रेरणा देणे, हेच माझं ध्येय आहे."**

**- सौ. तृप्ती देसाई, भूमाता ब्रिगेड (अध्यक्षा)**

या उपक्रमामुळे सामाजिक क्षेत्रात एक सकारात्मक संदेश गेला असून, वारकरी महिलांसाठीही ही एक उत्साहवर्धक बाब ठरली आहे. वारीत शेकडो मैलांचा प्रवास करत भगवंताच्या नामस्मरणात रंगलेल्या या महिला भगिनींना तृप्ती देसाई यांच्या रूपाने एक जिव्हाळ्याचा स्पर्श लाभला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## एबीईएकडून राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त 'पीजीडीजीई' कार्यक्रम सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (एनईपी) ची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात महत्त्वाच्या टप्प्यात दाखल होत असतानाच एक नवीन शिक्षक प्रशिक्षण उपक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. आदित्य बिर्ला एज्युकेशन ॲकॅडमीतर्फे (एबीईए) चालविण्यात येणारा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ग्लोबल एज्युकेशन ('पीजीडीजीई') आता जुलै २०२५ मध्ये प्रवेशासाठी खुला झाला आहे. यातून पुण्यातील शिक्षकांना बदलत्या शैक्षणिक परिस्थितीनुसार वर्गात शिकविण्याची त्यांची कौशल्ये अद्ययावत करण्यासाठी सुव्यवस्थित व पूर्णपणे ऑनलाईन मार्ग उपलब्ध झाला आहे.

"आधारशिला" हा पायाभूत अभ्यासक्रम, त्रिभाषिक शिक्षण आणि प्रकल्प-आधारित मूल्यांकनासह एनईपीच्या समावेशनावर महाराष्ट्राने जोर दिला आहे. त्यामुळे आपले शिक्षक हे राष्ट्रीय शिक्षण धोरणासाठी तयार असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी शाळांवर प्रचंड दबाव आला आहे. मात्र, सध्या सेवारत असलेल्या बहुतांश शिक्षकांना या धोरणाच्या केंद्रस्थानी असलेल्या डिजिटल, सर्वसमावेशक आणि

ADITYA BIRLA Education Academy
Engage. Evolve. Endeavour.

- **'एनईपी'नुसार शिक्षकांना अद्ययावत करण्यासाठी होणार मदत**

अनुभवात्मक शिक्षणपद्धतींची मर्यादित माहिती आहे. सरकारच्या २०23 मधील पाहणीनुसार, भारतातील ९७ लाख शिक्षकांपैकी केवळ ३०% शिक्षकांना या क्षेत्रांमध्ये औपचारिक प्रशिक्षण मिळाले आहे.

कौशल्याची ही वाढती तफावत ओळखून, एबीईएचा 'पीजीडीजीई' अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त, एनईपीशी अनुकूल असा अभ्यासक्रम उपलब्ध करून देतो. तो जागतिक मानकांची पूर्तता करतो आणि होतकरू व अनुभवी अशा इच्छुक आणि शिक्षकांसाठी तयार केलेला आहे. वर्षभर चालणाऱ्या या ऑनलाईन कार्यक्रमात प्रत्यक्ष सत्रे, असिंक्रोनस मॉड्यूल आणि मेंटरशिप यांचा मिलाफ घडला आहे.

## खडकवासला बायपास रस्त्यावरील पावसाचे पाणी घरात

### तत्काळ नाले सफाई करा अन्यथा आंदोलन : दीपक मते यांचा इशारा





**संत रोहिदास नगर खडकवासला येथे साचणाऱ्या पाण्याबाबत पुणे महानगरपालिकेकडे याबाबत वारंवार ऑनलाईन तक्रार करत आहे. मात्र त्यांच्याकडून कार्यवाही होत नाही. लोकांच्या घरात पावसाचे पाणी सातत्याने शिरत आहे. तात्काळ नालेसफाई करावी. अन्यथा आंदोलन करण्यात येईल.**

**- दीपक मते, सामाजिक कार्यकर्ते खडकवासला**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

समाविष्ट गावातील खडकवासला गावातील बायपास रस्त्याच्या कामाला पाच वर्षे पूर्ण झाली. मात्र पावसाळी लाईन काढली नाही. याशिवाय नालेसफाई केली नाही.

त्यामुळे या भागातील संत रोहिदास नगर परिसरातील घरामध्ये पावसाचे पाणी सातत्याने शिरत आहे.मात्र आजपर्यंत कोणतीही दखल प्रशासनाने घेतलेली नाही.

त्यामुळे या भागातील सामाजिक कार्यकर्ते दीपक मते यांनी पुणे महानगरपालिकेला ऑनलाईन तक्रारीच्या माध्यमातून याविषयी तक्रार केली होतो.

मात्र अधिकाऱ्यांनी दिरंगाईपणा केला आहे. या भागात पाऊस सातत्याने पडत असल्याने अनेक घरांमध्ये पाणी शिरत आहे. या भागातील नालेसफाई तात्काळ करावी.जुनी लाईन ही पुढे ओढ्या पर्यंत जोडण्यात यावी अशी मागणी दीपक मते यांनी केली आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास सामाजिक कार्यकर्ते दीपक मते यांनी मनपा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनाने दखल घेऊन नागरिकांचा प्रश्न मिटवावा अशी मागणी होत आहे.

# "भूपेंद्र मोरे" यांचे अस्त्र; प्रशासन झाले त्रस्त

### नऱ्हेच्या समस्यांवर तातडीने उपाय सुरू; निवडणूक नसतानाही जनतेच्या प्रश्नांसाठी मैदानात उतरलेला नेता : स्थानिकांची प्रतिक्रिया

- **मोरेंच्या चक्का जाम आंदोलनाने प्रशासन ताळ्यावर**
- **अर्धवट सर्व कामे तातडीने सुरू**
- **नेता असावा तर असा म्हणत नागरिकाकडूनही भूपेंद्र मोरे यांचे कौतुक**







**पुणे (दै. आरंभ पर्व)**
**प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक**

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट नऱ्हे परिसरातील विविध समस्येने बाबत सामाजिक कार्यकर्ते व केंद्र मोरे यांनी शनिवारी चक्काजाम आंदोलन केले. तब्बल पाच तासानंतर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त श्रद्धा पोतदार यांच्यासह अधिकारी व अधिकारी पोलीस अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

भूपेंद्र मोरे यांनी मांडलेल्या मागण्या कचरा, पाणीपुरवठा, रस्त्यावरील खड्डे ,ट्रॅफिक, रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज आदी विविध जनहिताच्या मागण्या होत्या.

परिसरातील नागरिकांनीही सामाजिक भान जपत भूपेंद्र मोरे यांना मोठा पाठिंबा दिला.शनिवार असतानाही मोठ्या संख्येने नागरिक व महिला चक्काजाम आंदोलनात सहभागी झाले.

राजकीय अजेंड्यावर काम न करता सामाजिक विषयावर काम करणाऱ्या भूपेंद्र मोरे यांचे भागातील नागरिकांनी मोठे कौतुक केले.

नेता असावा तर असा म्हणत त्यांचे त्यांच्या कार्याबद्दल नागरिकांनी आभार मानले.

कोणतेही निवडणूक वा रणधुमाळी नसतानाही हा नेता जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावर भर पावसात ड्रेनेजच्या पाण्यात थांबतोय याबद्दल नऱ्हे वासियांना मोरे यांच्या हेवा वाटला.

या आंदोलनानंतर लागलीच पुणे महानगरपालिका प्रशासन कामाला लागले असल्याचे चित्र दिसत आहे. नऱ्हे परिसरातील ड्रेनेज कामामुळे राहिलेले अर्धवट रस्ते काल पूर्ण करण्यात आले.

कृष्णाई नगर भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार आहे. रस्त्यावरील खड्डेही या आठवड्यात भरून घेतले जाणार आहेत.

पाणीपुरवठा संबंधी ही लवकरच तोडगा निघणार आहे. त्यामुळे "भूपेंद्र अस्त्र"ने केलेला चक्काजाम वार निशाण्यावर पोचल्याचे चित्र दिसत आहे. फक्त नऱ्हे नव्हे तर धायरी,सिंहगड रोड , खडकवासला भागात त्यांच्या आंदोलनाची चर्चा जोरात होती. प्रशासनाला वठणीवर आणायचे असेल तर भूपेंद्र मोरे यांच्यासारखा पॅटर्न अवलंबावा लागेल अशी नागरिकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.


आगामी काळात भूपेंद्र मोरे यांच्याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे हे मात्र नक्की.

## थोडक्यात



### धायरीत १८ वर्षाची परंपरा कायम; योग दिन उत्साहात साजरा

**धायरी (आरंभ पर्व) : जागतिक योग दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खडकवासला मतदारसंघातील धायरी येथे अठरा वर्ष सातत्याने योग दिनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.यावर्षीही ती परंपरा कायम करण्यात आली. भाजपा धायरी वडगाव मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांच्या संयोजनातून हा जागतिक योग दिन संपन्न झाला. जवळपास अडीचशे नागरिकांनी यामध्ये भाग घेतला. यशवंत लायगुडे यांनी सातत्याने सामाजिक उपक्रमाना कायमस्वरूपी सहकार्य केले आहे. त्याची प्रचिती या निमित्त अधोरेखित झाली. गेली 18 वर्षे हून अधिक काळ योग दिनाचे नियोजन ते व त्यांचे लायगुडे कुटुंब करत आहे. योग दिनाचे महत्व यानिमित्त सांगण्यात आले. शरीरासाठी योग हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. सर्वांनी योगासने केल्यास निश्चितपणे आरोग्याला त्याचा फायदा होतो. आपण सर्वांनी योगासने करावीत. तणावमुक्त जीवन जगावे असे मत यावेळी मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी मांडले. सकाळी पहाटे झालेल्या या कार्यक्रमास मोठी गर्दी होती. यावेळी अनेक नागरिक उपस्थित होते.**



### जास्तीत जास्त तरुणांनी व्यवसायामध्ये उतरावे : आ. सुभाष देशमुख

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनेअंतर्गत जास्तीत जास्त तरुणांनी व्यवसायामध्ये उतरावे व योजनेचा लाभ घेऊन व्याजाचा परतावा घ्यावा. तरुणांनी रोजगार तयार करुन समाजाला पुढे न्यावे. तरुणांनी व्यवसायात उतरण्यासाठी सकारात्मक विचार करुन धाडस केले पाहिजे हा मुख्य उद्देश लोकमंगल समूहाचे सर्वेसर्वा व लोकमंगल बँकेचे संस्थापक आमदार सुभाष देशमुख यांचा असल्याचे मत लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवाजी माळी यांनी व्यक्त केले. लोकमंगल बँक लोकमंगल को ऑफ बँक लि. सोलापूर शाखा हडपसर यांच्या वतीने उरुळी कांचन पतसंस्थेच्या कार्यालयात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजने अंतर्गत पर्यटक योजने अंतर्गत, वाहन कर्ज, इतर कर्ज शून्य टक्के व्याज दराने लोकमंगल बँकेच्या माध्यमातून कर्ज वाटप करण्यात येणार असल्याची माहिती मार्गदर्शन संवाद बैठक सभासद तसेच खातेदार यांच्यासाठी आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी सोलापूर मुख्य शाखेतील सुदन सुरवसे, लोकमंगल बँक हडपसर शाखेचे शाखाधिकारी अंकुश गायकवाड, लोण विभागाचे कृणाल खरोटे, पुणे विभागीय अधिकारी कमलाकर पाटील, उरुळी कांचन शाखेचे शाखाधिकारी अभिजीत साखरे, लोणी काळभोर शाखेचे शाखाधिकारी मारुती चौगुले, सल्लागार अक्षदा कांचन, नंदकुमार मुरकुटे, रविकांत यादव, सविता कांचन, कर्मचारी मयुरी बोडके, मृणाल कांचन, सोनाली वाले, अनिकेत जगताप, सुनिल तुपे, गजानन जगताप, अनिरुद्ध मराठे, भाऊ जाधव ,अविनाश विभुते आदी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये अंकुश गायकवाड यांनी सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन कुणाल खरोटे यांनी तर आभार अमोल भोसले यांनी मानले.**

### हातांचे पंजे छाटणाऱ्या आरोपींना पुन्हा अटक; तरुणाच्या प्रकृतीत सुधारणा

**वाकड(आरंभ पर्व) : तरुणावर कोयत्याने खुनी हल्ला करत, त्याच्या दोन्ही हातांचे पंजे तोडणाऱ्या तीन आरोपींना गुरुवारी (ता. २६) वाकड पोलिसांनी पुन्हा अटक केली. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता, चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. रोहन निमज (वय २०), शुभम पवार व प्रशांत सकट (वय २२, रा. सर्वजण महादेव कॉलनी, गुजर नगर, थेरगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. सोमवारी (ता. २३) राहुल कनघरे या तरुणावर त्यांनी खुनी हल्ला करत कोयत्याने त्याच्या दोन्ही हातांचे पंजे छाटले होते. या प्रकरणी वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले होते. मात्र, पोलिसांनी केलेली अटक बेकायदा असल्याचे कारण देत २४ तासांच्या आत त्यांची सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्यामुळे आरोपींना सोडण्याची नामुष्की पोलिसांवर ओढवली होती. त्यामुळे वाकड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संतापलेल्या नातेवाइकांनी बुधवारी (ता. २५) वाकड पोलिस ठाण्यात ठिय्या मांडला होता.**

## थोडक्यात



### रुग्णहक्क जनसेवा ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

पुणे (आरंभ पर्व) : गरजू रुग्णांसाठी धडपडीने काम करणाऱ्या रुग्ण हक्क जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. 25 जून 2025 रोजी विरंगुळा हॉल धनकवडी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दीपक चौघुले यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पदाधिकारी अनिल चौगुले हरिभाऊ दळवी दीपराज सावंत संदीप नाईकननवरे, राजनंदनी गव्हाणे अमित जांभळे आदी मान्यवर उपस्थित होते. दरवर्षी या संस्थेच्या मार्फत हजारो विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते दीपक चौघुले यांच्यामार्फत शालेय साहित्य वाटप करण्यात येते. रुग्णहक्क सेवा ट्रस्ट संस्थेच्या मार्फत अनेक गरजू रुग्णांना बिलामध्ये सवलत व इतर काही सुविधा देण्यात आले आहेत. या शालेय साहित्य वाटप प्रसंगी बोलताना सामाजिक कार्यकर्ते दीपक चौघुले यांनी समाजाची सेवा हीच खरी सेवा असल्याचे मत व्यक्त केले.



### राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

धायरी (आरंभ पर्व) : धायरी येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना खडकवासला विधानसभा काँग्रेसच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. जातिभेद निर्मूलन अस्पृश्यता निवारण स्त्रियांचा उद्धार बहुजनांचा शिक्षण विकास औद्योगिक प्रगती शेतीचा विकास इत्यादी क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणारे, आपली राजसत्ता खऱ्या अर्थाने अपेक्षित वंचित समाजासाठी वापरणारे आणि आरक्षणाचे प्रणेते असणारे लोकराज्य राजर्षी छत्रपती शाहू महाराज असे प्रतिपादन चव्हाण पाटील यांनी केले. यावेळी उपस्थित बारामती लोकसभा उपाध्यक्ष सुरेश मते, माजी सरपंच संदीप अण्णा चव्हाण, पुणे शहर काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग उपाध्यक्ष धनंजय पाटील, किसन काँग्रेस चे हवेली तालुका अध्यक्ष रघुनाथ यादव, शिवाजी पोकळे,विश्वजीत जाधव, राजाभाऊ कुंभार आदी उपस्थित होते.

### के. जे. सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट : सहाव्या तुकडीस प्रारंभ



पुणे (आरंभ पर्व) : कामकाज करणाऱ्या व्यावसायिकांसाठी खास तयार करण्यात आलेल्या 'वर्किंग एक्झिक्युटिव्हजसाठी एमबीए' या प्रमुख अभ्यासक्रमाच्या सहाव्या तुकडीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याची घोषणा सोमय्या विद्याविहार विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या के. जे. सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (केजेएसआयएम) या अग्रगण्य बी-स्कूलने केली आहे. १५ महिन्यांचा हा ऑनलाइन अभ्यासक्रम मध्यम कारकीर्द गाठलेल्या व्यावसायिकांना प्रगत व्यवस्थापन व नेतृत्व कौशल्ये मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. आजच्या सतत बदलत्या आणि स्पर्धात्मक व्यावसायिक वातावरणात यशस्वी होण्यासाठी ही कौशल्ये अत्यावश्यक आहेत. बीएफएसआय (बँकिंग, फायनान्स व विमा), आरोग्यसेवा, उत्पादन, विक्री व विपणन, आयटी / आयटीईएस अशा विविध क्षेत्रांत ३ ते १५ हून अधिक वर्षांचा अनुभव असलेल्या व्यावसायिकांकडून या अभ्यासक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भारतभरातील विविध भौगोलिक पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी दाखल झाले आहेत.

## मोरेंच्या चक्का जाम आंदोलनानंतर

# मनपा पाणीपुरवठा विभागाकडून नऱ्हेच्या पाणीपुरवठ्याबाबत आढावा

### नागरिकांना मुबलक पाणी मिळावे भूपेंद्र मोरे यांची मागणी

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील विविध समस्येने त्रस्त असलेल्या नागरिकांनी भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच चक्काजाम आंदोलन केले होते.

त्यामध्ये पाणीपुरवठा संबंधी ही अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यावेळी सहाय्यक आयुक्त श्रद्धा पोतदार यांनी संबंधित पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना यासंबंधी आढावा घेणे संबंधी आदेश दिले होते.

त्यानंतर नऱ्हेभागातील विविध ठिकाणी पाणीपुरवठ्याबाबत पाणीपुरवठा च्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्यासह विविध भागाची पहाणी केली. व पाणीपुरवठ्यासंबंधी आढावा घेतला. सर्व अडचणी लक्षात घेऊन लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.





पुणे महानगरपालिकेच्या संहितेमध्ये स्पष्ट पणाने नमूद आहे की जिथे जिथे महानगरपालिकेला पाणीपुरवठा व्यवस्थित करता येत नाही तिथे तिथे महानगरपालिका टँकरने मोफत पाणीपुरवठा करणार असे त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु नऱ्हेगावमध्ये अशा प्रकारची कोणतीही योजना सुरू दिसत नाही या उपर येथील कर्मचारी नागरिकांशी आर्थिक व्यवहाराचे संगणमत करून पाणी कमी जास्त प्रमाणामध्ये सोडतात या सर्व गोष्टी भूपेंद्र मोरे यांनी पाणीपुरवठा विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या .

यावेळी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी नऱ्हे परिसरातील नागरिकांना आवश्यक तेवढा पाणीपुरवठा करण्यात यावा. व शुद्ध पाणी पुरवठ्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा अशी मागणी केली.

येत्या काळामध्ये काही निर्णय होऊन पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्याची शक्यता आहे. यावेळी महानगरपालिकेचे अभियंता श्री.सुहास महिंद्रकर, स्वारगेट पाणीपुरवठा कनिष्ठ अभियंता श्री. अजय गावित, श्री. प्रेम करंजकर तसेच पाणीपुरवठा कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## टाटा मोटर्सकडून एस प्रो लॉँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लॉँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. 3.99 लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.



उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

## जाधवराव परिवाराकडून नवले शाळेस वृक्ष भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आपल्याकडे किती आहे त्यापेक्षा आपण ज्या समाजाचे घटक आहोत त्या समाजाला किती देतो याला जास्त महत्त्व आहे. घासातला घास देणारे आणि जिथे गरज आहे तिथे कोणताही गाजावाजा न करता मदत करणारी माणसं आता खूप कमी आहेत व अशी माणसं कायम लक्षात रहातात. अशीच आपल्या पूर्वजांची आठवण म्हणून व पर्यावरण संवर्धनासाठी वैविध्यपूर्ण वृक्षदान जाधवराव परिवारातर्फे नारायण नवले शाळेला देण्यात आले. बाजीराव पेशवे आणि



चिमाजी आप्पा यांचे युद्ध शास्त्रातील गुरू म्हणून ओळखले जाणारे आणि मराठा साम्राज्याच्या विस्तारात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणारे , आपल्या पराक्रमाने परकीयांना धडकी भरवणारे श्रीमंत सरदार पिलाजीराव जाधवराव यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे नांदेड गावचे वंशज ,शेतकरी, उद्योजक व विविध माध्यमांतून सामाजिक ऋण फेडणारे आदरणीय समीरदादा जाधवराव व त्यांच्या कुटुंबियांनी आमच्या कै नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्रमांक २०४ बी ला झाडे भेट दिली.

समीर नवले व त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण देणगी बद्दल आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .सविता मानकर मॅडम समीर नवले व त्यांच्या कुटुंबियायांचेकडे आभार व्यक्त करुन शाळेच्या वतीने त्यांना शाल व श्रीफळ दिले. सदर कार्यक्रमास रवी पवार यांच्यासह मुख्याध्यापिका सविता मानकर व शाळेतील देशमुख, रणधीर , दराडे , हरपुडे, तनपुरे, साठे , करंजावणे , नाडकर्णी सर्व शिक्षक , बालवाडी शिक्षिका व सेवक उपस्थित होते.

# नागेश चव्हाण बार्शी तालुक्याच्या राजकारणात सक्रिय होणार?

### उमेश पाटील यांची मैत्री चव्हाण यांना राजकारणात पुन्हा संधी देणार

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्याच्या राजकारणामध्ये पुन्हा एकदा नागेश चव्हाण सक्रिय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

या निवडीनंतर मोहोळ येथे मोठा जल्लोष करण्यात आला. यामध्ये बार्शी तालुक्याचे नेते श्री. नागेश चव्हाण यांनी दुचाकी व चार चाकी गाड्यांचे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यास मोठा तुफानी प्रतिसाद मिळाला.

याशिवाय सर्व वृत्तपत्रांच्या मार्फत त्यांनी मोठी जाहिरात बाजी केली होती. त्यामुळे आगामी



काळात नागेश चव्हाण यांना उमेश पाटील ताकद देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कारण या दोन्ही नेत्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शिवाय बार्शीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला एक खंबीर नेतृत्व मिळणार आहे.

गेल्या काही दिवसापासून शांत भूमिकेत असलेले श्री. चव्हाण यानिमित्त पुन्हा एकदा राजकीय पटलावर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये चव्हाण पक्षासाठी मोठी कामगिरी बजावू शकतात.

नागेश चव्हाण यांनी 2019मध्ये बार्शी विधानसभा निवडणूक ही मनसे कडून लढले आहेत. याशिवाय तालुक्यामध्ये वंचित बहुजन आघाडी साठी ही त्यांनी जोरदार प्रयत्न केले होते.

याशिवाय सोलापूर जिल्हा रहिवासी संघटना , छावा संघटना, मानव अधिकार संस्था या मार्फत अनेक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे बार्शी तालुका व वैराग परिसरामध्ये त्यांचीही ताकद आहे. मध्यंतरी राजकीय परिस्थितीमध्ये मधील तरी कोणत्याही पक्षाशी संबंधित न होता त्यांनी आपल्या व्यवसायाकडे लक्ष दिले होते.

मात्र जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांची जिल्हाध्यक्षपदी वर्णी होताच ते पुन्हा एकदा राजकारणामध्ये सक्रिय होणार आहेत. बार्शीच्या राजकारणामध्ये आजी-माजी आमदारांचे परंपरागत राजकारण असताना पुन्हा एकदा तिसरा भिडू येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी काळामध्ये बार्शी तालुक्याच्या राजकीय पटलावर नागेश चव्हाण कशी एन्ट्री करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**जनसेवेला प्राधान्य**

**प्रत्येकाच्या जीवनामध्ये संघर्ष हा ठरलेला असतो. मात्र तरीही त्यातून जनसेवेसाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. यापूर्वीही जनसेवेसाठी प्रयत्न केला याही पुढे जिल्हाध्यक्ष उमेश दादा पाटील यांच्यामार्फत बार्शी तालुका व जनतेसाठी प्रयत्न करणार आहे.**

**- श्री नागेश चव्हाण, अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

# दै. 'आरंभ पर्व'च्या अकोले संपादकपदी डॉ. विश्वास आरोटे

### स्थानिक पत्रकारितेला नवी दिशा मिळणार

### 'दै. आरंभ पर्व'ला स्थानिक पातळीवर नवे बळ

**अकोले (दै. आरंभ पर्व)**

अकोले तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात एक नवे पर्व सुरू होत असून, 'दै. आरंभ पर्व' या लोकप्रिय दैनिकाच्या अकोले संपादकपदी ज्येष्ठ पत्रकार व अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. विश्वास आरोटे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे दैनिकाची अकोलेतील व्याप्ती व विश्वासार्हता अधिक बळकट होणार असून, तालुक्याच्या प्रश्नांना आवाज मिळण्यास मदत होईल, असा विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

डॉ. आरोटे हे गेली अनेक वर्षे पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक कार्य आणि संघटनात्मक नेतृत्व या क्षेत्रांमध्ये सक्रिय आहेत. त्यांचा दांडगा जनसंपर्क, स्पष्टभाषी विचारसरणी आणि भेदक पत्रकारिता हीच त्यांची खरी ओळख आहे. ते



स्थानिक पत्रकार संघटनेचे प्रभावी नेतृत्व करत असून, तालुक्यातील पत्रकारांना व्यासपीठ, मार्गदर्शन आणि न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेकदा पुढाकार घेतला आहे.

डॉ. आरोटे यांच्या संपादकपदाच्या निमित्ताने 'आरंभ पर्व' या दैनिकाला अकोले परिसरात भक्कम पाठबळ मिळणार आहे. त्यांच्या माध्यमातून तालुक्याच्या स्थानिक समस्या, शेती, शिक्षण, आरोग्य, प्रशासनाच्या भूमिका व गटराजकारण यावर अभ्यासपूर्ण आणि जनतेच्या भल्यासाठीची भूमिका मांडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्थानिक राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमधून या निवडीचे स्वागत करण्यात आले आहे."डॉ. आरोटे यांच्या नेतृत्वाखाली 'आरंभ पर्व' अधिक प्रभावीपणे तालुक्याच्या जनतेशी संवाद साधेल व लोकशाही मजबूत करण्यास हातभार लावेल," अशी प्रतिक्रिया तालुक्यातील एका ज्येष्ठ पत्रकाराने दिली.

डॉ. विश्वास आरोटे यांच्या संपादकपदाच्या निमित्ताने 'दै. आरंभ पर्व'ची अकोले तालुक्यातील विश्वासार्हता, व्याप्ती व सामाजिक भान अधिक वाढेल, याबाबत कोणतीही शंका नाही. ही निवड म्हणजे केवळ एक पत्रकाराची नियुक्ती नसून, अकोलेसारख्या ग्रामीण भागात उत्तरदायित्वपूर्ण पत्रकारितेचा आरंभ होण्याची नांदी ठरेल, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**विश्वास आणि ध्येयवाद यांचा संगम**

**डॉ. विश्वास आरोटे हे पत्रकारितेला एक सामाजिक जबाबदारी मानतात. "पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून, ती समाजाला योग्य दिशा दाखविणारे प्रभावी साधन आहे," असे त्यांचे मत आहे. त्यांचा अनुभव, विचारशील दृष्टिकोन व जनतेशी असलेली जवळीक या दैनिकाच्या कार्याला नवसंजीवनी देईल.**

**- श्री. प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक, पुणे**

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## थोडक्यात




### सोमैया विद्याविहार विद्यापीठाने प्रवेशाच्या अंतिम फेरीची केली घोषणा

पुणे (आरंभ पर्व) : मुंबईतील आघाडीच्या बहुविद्याशाखीय खाजगी संस्थांपैकी एक असलेल्या सोमैया विद्याविहार विद्यापीठाने (एसव्हीयू) २०२५–२६ शैक्षणिक वर्षासाठी त्यांच्या पदवीपूर्व (यूजी) आणि पदव्युत्तर (पीजी) कार्यक्रमांसाठी प्रवेशाच्या अंतिम फेरीची घोषणा केली आहे. विविध क्षेत्रांमध्ये ८० हून अधिक उद्योग-अग्रणी कार्यक्रमांसह, एसव्हीयू हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता आणि जागतिक प्रदर्शन यांना उद्योगाच्या सान्निध्याशी जोडणारा एक परिवर्तनकारी शैक्षणिक प्रवास प्रदान करते.सर्व पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अर्जांची अंतिम फेरी ३० जून रोजी होणार आहे, तर गुणवत्ता यादी जुलैच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केली जाईल. यूजी प्रवेश पात्रता ही बारावीच्या गुणांवर, एसव्हीयूईटी किंवा जेईई, एमएचटी-सीईटी, सीयूईटी, पीईआरए-सीईटी किंवा सॅट मधील वैध गुणांवर आधारित आहे आणि पीजी चा प्रवेश हा अर्जदाराकडे संबंधित पदवीपूर्व पदवी असणे आवश्यक आहे. सोमैया विद्याविहार विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रो. सतीश मोध म्हणाले की सोमैया विद्याविहार विद्यापीठात आमचा ठाम विश्वास आहे की शिक्षण ही एक परिवर्तनकारी शक्ती आहे, जी व्यक्तींना चिकित्सकपणे विचार करण्यास, नैतिक मूल्यांनुसार वागण्यास आणि उद्देशपूर्ण नवोन्मेष करण्यास सक्षम बनवते. आमचे एकात्मिक शैक्षणिक मॉडेल विद्यार्थ्यांना केवळ यशस्वी करिअरसाठीच नव्हे, तर जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अर्थपूर्ण नेतृत्वासाठीही तयार करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्य: एसव्हीयू हे १००% पर्यंत शिक्षण शुल्कावर गुणवत्ताधिष्ठित शिष्यवृत्ती प्रदान करते. एसव्हीयू हे खालील मदत आणि शिष्यवृत्ती प्रदान करते.



### कळमोडी धरण १०० टक्के भरले

राजगुरूनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कळमोडी धरण १०० टक्के भरले. मागील वर्षीपेक्षा एक महीना अगोदरच यावर्षी धरण भरले असून सलग तीन वर्षांपासून जिल्ह्यात पहिले भरणारे हे धरण आहे. खेड तालुक्याच्या पश्चिम व पूर्व भागाला तसेच आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठाराला वरदान ठरलेल्या या कळमोडी धरणातील सांडव्यावरून पूर्ण क्षमतेने पाण्याचा विसर्ग आरळा नदीपात्रात होत असल्याची माहिती धरण प्रशासनाचे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांनी दिली. हा प्रकल्प भरून वाहू लागल्याने पश्चिम भागातील नागरिकांकडून तसेच शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. कळमोडी धरण मंगळवारी (दि. २४) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पूर्ण क्षमतेने भरताच धरणाच्या सांडव्यावरून ३२ क्युसेकने पाणी वाहण्यास सुरुवात झाली. या धरणात सन २०१० पासून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होण्यास सुरुवात झाली होती. पाण्याचा विसर्ग करण्यासाठी धरणास कोणत्याही प्रकारचे दरवाजे नसून धरण भरताच सांडव्यावरून वेगाने पाणी वाहण्यास सुरुवात होते. कळमोडी धरण परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने धरणाच्या पाणीसाठ्यात वेगाने वाढ होऊन धरण शंभर टक्के भरले. धरणात ४२.८७ दशलक्ष घनमीटर म्हणजेच १.५१४ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. कळमोडी धरण भरल्याने चासकमान धरणाचा पाणीसाठा वाढण्यास मदत होते. गतवर्षी धरण २१ जुलै रोजी भरले होते. या वर्षी २७ दिवस अगोदर २४ जून रोजी हे धरण भरले. कळमोडी धरण व परिसरात एक जूनपासून ३८३ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. धरणामुळे कळमोडी, चिखलगाव, साकुर्डी, देवोशी अंतर्गत कुडे, बांगरवाडी, येनिये, घोटवडी या गावांना पाण्याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होतो. पश्चिम भागातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना या कळमोडी प्रकल्पावर अवलंबून असल्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्न यामुळे सुटला आहे. नदीकाठच्या सर्व गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, नदीपात्रातील शेतीविषयक औजारे अथवा तत्सम साहित्य, जनावरे यांना तत्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



### मा. विद्यार्थ्यांकडून शालेय साहित्य वाटप

राजगुरूनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : वाफगाव (ता. खेड) येथील महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. आपण समाजाचे व शाळेचे देणे लागतो या हेतूने आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये या हेतूने वाफगाव येथील माजी विद्यार्थ्यांनी शालेय साहित्य व वह्या वाटप हा उपक्रम राबविला. हा स्तुत्य उपक्रम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी दर वर्षी राबविण्यात येत असल्याचे माजी विद्यार्थी व उपक्रमाचे संयोजक पांडुरंग थिटे यांनी सांगितले.

# लीला गांधी या आपल्या पुण्याचे, कलेचे वैभव

## त्यांना पद्म पुरस्कार मिळावा यासाठी शिफारस करू - केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

### ज्येष्ठ अभिनेत्री, नृत्यांगना लीला गांधी यांना 'बालगंधर्व जीवनगौरव पुरस्कार' प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेत्री लीला गांधी या आपल्या पुण्याचे, कलेचे वैभव आहे. त्यांचा सन्मान म्हणजे आपल्या सर्वांचा सन्मान आहे. त्यांना पद्म पुरस्कार मिळावा यांची शिफारस राज्य सरकारच्या माध्यमातून आपण केंद्र सरकारकडे करू, असा शब्द केंद्रीय राज्यमंत्री नागरी विमान वाहतूक मुरलीधर मोहोळ यांनी आज दिला. केंद्रीय राज्यमंत्री नागरी विमान वाहतूक मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेत्री लीला गांधी यांना बालगंधर्व परिवाराच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर च्या वर्धापनदिना निमित्त 'बालगंधर्व जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी मोहोळ बोलत होते. या प्रसंगी मा.आमदार उल्हासदादा पवार, अ.भा मराठी नाट्य परिषदचे अध्यक्ष प्रशांत दामले, डॉ. संजय चोरडिया, चंदुकाका ज्वेल्सचे सिद्धार्थ शहा, पुण्याचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, बारामती नाट्य परिषदेचे अध्यक्ष किरण गुजर, बालगंधर्व यांच्या नातसून अनुराधा राजहंस, प्रशासन अधिकारी राजेश कामठे,,बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले आदि मान्यवर उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, गेली 17 वर्ष बालगंधर्व रंग मंदिराचा वर्धापन दिन सोहळा साजरा केला जात आहे. या निमित्ताने पुण्याची सांस्कृतीक ओळख जपण्याचे काम केले जात आहे. ज्येष्ठ सिने नाट्य अभिनेत्री लीला गांधी यांना आपण सर्व 'ब्लॅक अँड व्हाइट'च्या काळा पासून पाहत आलो आहोत. त्यांचे चित्रपट त्यांची कारकीर्द ही वाखणण्याजोगी आहे. लीला गांधी या आपल्या पुण्याचे, कलेचे वैभव आहे. त्यांचा सन्मान म्हणजे आपल्या सर्वांचा सन्मान आहे. त्यांना पद्म पुरस्कार मिळावा याची शिफारस राज्य सरकारच्या माध्यमातून आपण केंद्र सरकारकडे करू, असा शब्द केंद्रीय राज्यमंत्री नागरी विमान वाहतूक मुरलीधर मोहोळ यांनी आज दिला. उल्हास पवार म्हणाले, पू. ल. देशपांडे यांच्या संकल्पनेतून बालगंधर्व रंगमंदिराची निर्मिती झाली. तत्कालीन राजकीय नेत्यांनी त्यांना कोणतीही आठकाठी आणली नाही, ही बाब कौतुकास्पद आहे. बालगंधर्वांच्या नावाने दिला जाणार पुरस्कार लीला गांधी यांना मिळतोय म्हणजे अतिशय यथार्थ निवड आहे.

प्रशांत दामले म्हणाले, अलीकडे महाराष्ट्रात ज्यांना नाट्यगृहांबद्दल काहीही माहिती नाही अशी लोकं नाट्यगृह बांधत आहेत. नाट्यगृह बांधल्या नंतर सुधारणा करण्यापेक्षा आधीच सुसज्ज आणि नियोजनबद्ध नाट्यगृह बांधली गेली पाहिजेत. यासाठी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदीर, गडकरी रंगयातन आणि वाशीच विष्णुदास भावे नाट्यगृह यांचे प्लॅन फॉलो करायला हवेत.

एव्हडे केले तरी शासनाचे कोट्यावधी रुपये वाचतील. तसेच नाट्यगृहाशी संबंधीत लोकांना सोबत घेवून नाट्यगृहांचे नियोजन केल्यास ते अचूक ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच राज्यातील नाट्यगृहांसंदर्भात पुढील अडीच वर्षासाठी शासनाने एक आराखडा तयार करण्यात आला असून त्यामुळे तरी राज्यातील नाट्यगृह निट होतील असा आशावाद देखील दामले यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आपलो मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी म्हणाल्या, "वयाच्या नवव्या वर्षा पासून मी कलाक्षेत्रात कार्यरत असून आज तागायत मी अनेक हिंदी, मराठी चित्रपटात काम केले आहे. समर्थपणे लावणी सादर केल्यानेच अनेक घरंदाज मुली आजही लावणी प्रकार करायला तयार असतात. हिंदीत सर्वात प्रथम नृत्य दिग्दर्शन करण्याची संधी मला यामुळेच मिळाली. आपले कला क्षेत्रातील हे योगदान पाहता आपल्याला पद्म पुरस्कार मिळावा", अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी फोटोग्राफर अक्षय परांजपे, पत्रकार कल्याणी फडके- केळकर, नाट्यनिर्माते पत्रकार अशोक घावटे, नाट्य अभ्यासक व लेखक जयराम पोतदार, गायिका आशाताई खाडीलकर आदींना बालगंधर्व गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविक मेघराज राजेभोसले यांनी केले. मानपत्रांचे वाचन अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा कुलकर्णी यांनी केले तर आभार चित्रसेन भवार यांनी मानले.

# "पहिल्या कसोटीत इंग्लंडची सरशी"

### डॉ. अनिल पावशेकर



**(दै. आरंभ पर्व)**

भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडची सरशी झाली असून भारताचा धक्कादायक पराभव झाला आहे. दोन्ही डावात भारतीय संघाचा वरचष्मा राहिला होता परंतु ऐनवेळी तळाचे फलंदाज आणि क्षेत्ररक्षकांनी सुमार कामगिरी केल्याने भारताच्या हातून सामना निसटला आणि इंग्लंडचा संघ विजयी झाला आहे. खरेतर कसोटीत प्रत्येक दिवशी प्रत्येक सत्रात कामगिरीत सातत्य राखणे गरजेचे असते आणि इथेच आपला संघ इंग्लंडवर लगाम घालू शकला नाही. त्यातही दोन्ही डावात मान्सून सेल लागल्याप्रमाने भारतीय क्षेत्ररक्षकांनी जवळपास अर्धा डझन झेल सोडले आणि स्वहस्ते सामना इंग्लंडला बहाल केला.

झाले काय तर गेल्या ९ कसोटी सामन्यांत भारतीय संघाची कामगिरी ७ पराभव, एक ड्रॉ आणि एक विजय अशी दारिद्र्य रेषेखालची होती. त्यातही रोहित, विराट वानप्रस्थाश्रमाला लागल्याने "मेरे करन अर्जुन आएंगे, मॅच बचाएंगे" असे अजिबात नव्हते. त्यामुळे जे का रंजले गांजले आहेत ते संघात ठेवून भारतीय संघाची वाटचाल चालू झाली. केएल राहुल सोडला तर करुण नायर, जडेडा, शार्दूल ठाकूर हे भुले बिसरे गीत होते आणि त्यांची कामगिरीही यथातथाच राहिली. तर फलंदाजीत नवोदित साई सुदर्शन आणि गोलंदाजीत क्रिष्णा हे प्रसिद्ध होऊ शकले नाहीत.

वास्तविकत: पहिल्या डावात जैस्वाल, शुभमन गिल आणि पंतने शतकांची रास लावून भक्कम सुरुवात केली होती. परंतु ४ बाद ४३० ते सर्वबाद ४७१ अशी आपली घसरगुंडी झाली. ९/११ च्या हल्ल्यात न्युयॉर्कचे ट्विन टॉवर जेवढ्या वेगाने कोसळले त्यापेक्षाही जास्त वेगाने आपले तळाचे फलंदाज कोसळले. जणुकाही सर्वांच्या अंगात ग्लेन मॅक्सवेल घुसल्यासारखे ते त्वेषाने खेळले आणि स्वस्तात माघारी परतले. फलंदाजी म्हणजे निव्वळ चौकार आणि षटकार ठोकणे नव्हे तर भागीदारी करणे, खेळपट्टीवर तग धरून राहणे, विरोधी गोलंदाजांना थकवणे आणि शेपूट जास्तीत जास्त लांबवणे हे आपले फलंदाज विसरले. पहिल्या डावात कमीत कमी ५०० चा आकडा आपण नक्कीच गाठू शकलो असतो पण तसं झालं नाही.

फलंदाजांच्या मर्यादित कामगिरीला गोलंदाजांनी चांगली साथ दिली होती परंतु तिथे क्षेत्ररक्षण आडवे आले. इंग्लंडनेही काही झेल सोडले होते आणि भारतीय क्षेत्ररक्षकांनी मनापासून त्यांना रिटर्न गिफ्ट दिले. सर्वात कहर म्हणजे जडेजा सारखा क्षेत्ररक्षक जेव्हा झेल सोडतो तेव्हा नक्की कोणाकडून चांगल्या क्षेत्ररक्षणाची अपेक्षा करावी हे कळत नाही. तरीही आपल्या गोलंदाजांनी इंग्लंडला ४६५ वर थोपवून थोडीफार लाज राखली होती.

भारताचा दुसरा डाव जणुकाही पहिल्या डावाची कॅापी होती. यावेळी जैस्वाल, शुभमन ऐवजी केएल राहुल, पंतने शतके झळकावून संघाचा डोलारा सांभाळला. मात्र त्यानंतर पुन्हा एकदा भारतीय संघ ४ बाद ३३४ ते सर्वबाद ३६४ असा गळपटला. दुसऱ्या डावात कमीत कमी १०० धावा कमी केल्याने इंग्लंडवर जो दबाव निर्माण



व्हायला पाहिजे होता तो झाला नाही. पुन्हा एकदा तळातील फलंदाजांनी तू चल मै आया केल्याने इंग्लिश संघाचा हुरूप वाढला. चौथ्या दिवशी दबावात येणाऱ्या इंग्लंड संघाला भारतीय संघाने संध्याकाळी तुलनेत कमी धावांचे टार्गेट आणि पुरेसा वेळ दिल्याने ते ड्राईव्हिंग सिटवर येऊन बसले. पाचव्या आणि निर्णायक दिवशी इंग्लंडने भारतीय गोलंदाजांना भीक घातली नाही. बुमराह अँड कंपनी चातकासारखी विकेटची वाट बघत होते पण डकेट, क्राऊलीने दमदार फलंदाजी करत सामना इंग्लंडकडे झुकवला. खेळपट्टी जरूर जीवंत होती पण बॅझबॉलपुढे आपले गोलंदाज हतबल झाले. त्यातही जैस्वालने डकेटला नव्वदीत जीवदान दिल्याने भारतीय गोलंदाजांचे उरलेसुरले अवसान गळून पडले. मो. सिराज, प्रसिद्ध कृष्णाने जरूर लय पकडली होती मात्र तोपर्यंत "हुजूर आते आते बहोत देर कर दी" असे झाले होते.

प्रामाणिकपणे सांगायचं झालं तर रोहित, विराट संघात असताना आपल्या संघाची जी दादागिरी असायची, एक लय असायची, मैदानात जी एनर्जी दिसायची ती या सामन्यात दिसली नाही. कर्णधार म्हणून शुभमन नवखा असल्याने त्याला शिकायला वेळ द्यावा लागेल. तर गोलंदाजीत "एक अकेला बुमराह क्या करेगा" हा प्रश्न वारंवार पडतो. त्यातही बुमराहचे गोलंदाजीतील दुसऱ्या डावातील अपयश चिंतेची बाब आहे. जडेजा, शार्दूल ठाकूर हे दोघेही आपले अष्टपैलूत्व सिद्ध करू शकले नाहीत. तर नवोदित साई सुदर्शन आणि करून नायर फारशी चमक दाखवू शकले नाहीत. सर्वात जास्त निराशा झाली ती आपल्या संघाचे क्षेत्ररक्षण पाहून. संघाचे कोच असलेले श्रीयुत गौतम नक्कीच हा विषय गंभीरपणे घेऊन पुढे अशा चुका सुधारतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**थोडक्यात काय तर या कसोटीत फलंदाजांनी कमावले, क्षेत्ररक्षकांनी गमावले असे झाले आहे. गचाळ क्षेत्ररक्षण, लोअर ऑर्डरची अवसानघातकी खेळी, दुसऱ्या डावात निष्प्रभ गोलंदाजी हे आपल्या पराभवाचे प्रमुख कारण ठरले. समाधानाची बाब म्हणजे पंतने दोन्ही डावात धडाकेबाज खेळी करून डावाचा टेंपो राखला परंतु त्यानंतर इतर फलंदाजांनी डावाची माती केली. मालिकेत अजूनही ४ कसोटी सामने बाकी असल्याने भारतीय संघ मुसंडी नक्कीच मारू शकतो. मात्र त्याकरिता पहिल्या कसोटीत फारशी चमक न दाखवणार्यांना शाल श्रीफळ द्यावे लागेल. तसेच अभिमन्यू ईश्वरन, ध्रुव जुरेल, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, आकाशदीप, अर्शदीप, हर्षित राणा आणि कुलदीप यादव यांच्यातून योग्य निवड करावी लागेल.**

# आगामी काळात कार्यकर्त्यांना मोठी संधी देण्यात येणार : शेखर वडणे

### पुणे जिल्हाध्यक्ष शेखर वडणे यांचा भाजपा खडकवासला ग्रामीण मंडलतर्फे जाहीर सत्कार





**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी ने यश मिळवले आहे हे कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत आहे त्यामुळं आगामी काळात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकात कार्यकर्त्यांना ताकद दिली जाणार असल्याचे मत पुणे जिल्हा भाजपा अध्यक्ष शेखर वडणे यांनी व्यक्त केले. डोणजे येथे खडकवासला भाजपा ग्रामीण मंडल तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. देशाची झालेली प्रगती ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे यश मोठे आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकजुटीने भाजपा वाढवणेसाठी प्रयत्न करू मी आपल्या पाठीशी उभे राहू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष बाजीराव पारगे यांनी कार्यक्रम उद्देश थोडक्यात सांगितला. त्यामध्ये त्यांनी अध्यक्ष शेखर वडणे यांना शुभेच्छा दिल्या .

व खडकवासला विधानसभा मतदारसंघात ग्रामीण भागात भाजपा सक्षम करणार असल्याचे सांगितले. यावेळी खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांनी आभार मानले. यावेळी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यसम्राट आ. भिमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखाली हा परिसर भाजपमय करू असा निश्चय यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला.यावेळी दिव्यांग विकास आघाडी बाजीराव पारगे यांच्या तर्फे गरीब कुटुंबातील मुलांना वडणे व मान्यवरांच्या यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

स्व. शामाप्रसाद मुखर्जी यांची पुण्यतिथी चे औचित्य साधून कार्यक्रम आयोजित केला गेला.

यावेळी पुणे जिल्हा अध्यक्ष शेखर वडणे, खडकवासला मंडल अध्यक्ष नवनाथ तागुंदे, दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष बाजीराव नाना पारगे, धनंजय आप्पा कामठे , लालासाहेब जावळकर नंदूशेठ जवळकर ,विठ्ठल ठाकर ,खामगाव सरपंच संतोषी दारवटकर, दत्ताभाऊ पायगुडे, अजित कांबळे, नवनाथ मोकर किरण खिरीड,चंद्रकांत यादव किरण तांगोदे ,जानवी ताई ताराबाई नानगुडे ,सुनील मांढरे, सागर खुटवड, राजू दिघे राजू भामे,रसिका सणस,रोहिणी राहणे,सुनीलजी जागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.